RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

वर्ष १०, अंक ३४] बुधवार, मे २२, २०२४/ज्येष्ठ १, शके १९४६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

**अधिसूचना**

**विद्युत अधिनियम, २००३.**

**क्र. मविनिआ/तांत्रिक/विनियम/०३१४.**—विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) मधील कलम १८१ च्या उप-कलम (आर) आणि (एस) सहकलम ४२ च्या उप-कलम (५) ते (७) ने प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच या संदर्भात समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून व पूर्व-प्रसिध्दीनंतर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम, २०२० ('**मुख्य विनियम**') या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :

**१. संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ**

१.१ या विनियमांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) (पहिली सुधारणा) विनियम, २०२४, असे म्हणावे.

१.२ हे विनियम ते ज्या तारखेस **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करण्यात येतील त्या तारखेपासून अंमलात येतील.

**२ मुख्य विनियमांच्या विनियम ३ मध्ये सुधारणाः—**

२.१ मुख्य विनियमांचे विनियम ३.३ खालीलप्रमाणे बदलण्यात येतीलः

"३.३ वितरण परवानाधारक त्याच्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रातील प्रत्येक वितरण मंडलात एक (१) मंच स्थापन करील.

परंतु असे की, जर वितरण परवानाधारकाच्या वीज पुरवठ्याचे क्षेत्र बृहन्मुंबई व त्याच्याशी संलग्न क्षेत्र असेल तर प्रत्येक वितरण परवानाधारक वीज पुरवठ्याच्या अशा क्षेत्रासाठी किमान एक (१) तरी मंच स्थापन करील.

परंतु आणखी असे की, आयोग वेळोवेळी ज्या मार्गदर्शक सूचना किंवा निर्देश जारी करेल त्यांच्या अधीन राहून, मंचाचे अधिकारक्षेत्र हे वितरण परवानाधारकाकडून ठरविण्यात येईल.

परंतु आणखी असेही की, मुख्य विनियमांतर्गत एकापेक्षा जास्त मंडलांच्या अधिकारक्षेत्रासाठी स्थापित करण्यात आलेला मंच येथून पुढे तो ज्या मंडलामध्ये स्थित आहे त्या मंडलासाठी मंच म्हणून कार्य करेल. तथापि, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापर्यंत प्रलंबित असलेल्या सर्व गाऱ्हाण्यांचा निर्णय, संबंधित मंडलासाठी स्थापन करावयाच्या मंचाकडे हस्तांतरित न करता, केवळ अशा मंचाकडूनच घेण्यात येईल.

**स्पष्टीकरण** - या विनियम ३.३ च्या प्रयोजनासाठी, अशा रितीने, "वितरण मंडळ" या शब्दाचा अर्थ मंडळाच्या उत्तराधिकारी व्यक्ती/संस्थेच्या (एन्टीटी) मंडल कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रातील निश्चित केलेले भौगोलिक क्षेत्र, जे मंडळाच्या पुनर्संघटनेच्या अनुषंगाने विजेच्या वितरणाच्या कार्यांच्या संबंधात असेल, असा राहील."

२.२ मुख्य विनियमांतील विनियम ३.४ वगळण्यात येतात.

**३ मुख्य विनियमांच्या विनियम ४ मध्ये सुधारणा**

३.१ मुख्य विनियमांचा विनियम ४.१ चा उप-खंड (ए) खालीलप्रमाणे बदलण्यात येईलः

"(ए) या मंचाचा अध्यक्ष हा सेवानिवृत्त ज्येष्ठ न्यायिक अधिकारी; किंवा सेवानिवृत्त शासकीय अधिकारी जो अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा समकक्ष पदापेक्षा खालील दर्जाचा नसेल; किंवा एखाद्या नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयाचा सेवानिवृत्त प्राचार्य; किंवा एखाद्या नामांकित संस्थेतील विद्युत अभियांत्रिकी विभागाचा सेवानिवृत्त प्राध्यापक असेल; किंवा शासनाचा सेवानिवृत्त ज्येष्ठ विद्युत अभियंता असेल.

परंतु असे की, अध्यक्षांना महाराष्ट्र राज्याच्या स्थानिक भाषेचे कामापुरते ज्ञान असेल.

परंतु आणखी असे की, इच्छुक व्यक्तिंकडून अर्ज मागविण्यात आल्यानंतर आणि उमेदवारांच्या संक्षिप्त यादीमधून निवड करून आयोगाकडून अध्यक्षांची नियुक्ती करण्यात येईल.

परंतु आणखी असेही की, आयोग परवानाधारकाला अशी निवड प्रक्रिया आयोगाच्या मार्गदर्शना अंतर्गत करण्याचे विनिर्देशपूर्वक निर्देश देऊ शकेल. अशा प्रकरणी आयोग निवड समिती नामनिर्देशित करेल.

परंतु असेही की, आयोग अशा अर्जदारांच्या सचोटी आणि पूर्वपिठीकेची पडताळणी करील."

**४ मुख्य विनियमांच्या विनियम ५ मध्ये सुधारणा**

४.१ मुख्य विनियमांतील विनियम ५.३ चे परंतुक वगळण्यात येते.

४.२ मुख्य विनियमांतील विनियम ५.४ चे दुसरे आणि तिसरे परंतुक वगळण्यात येते.

**५ मुख्य विनियमांच्या विनियम १६ मध्ये सुधारणा**

५.१ मुख्य विनियमांचा विनियम १६.१ खालीलप्रमाणे बदलण्यात येतीलः

"१६.१ विद्युत लोकपाल हे उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती किंवा सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, शासनाचे सेवानिवृत्त सचिव किंवा समकक्ष अधिकारी यांच्यामधून गठीत करण्यात येतील."

**६ परिशिष्टमध्ये सुधारणा**

६.१ मुख्य विनियमांचे परिशिष्ट १ वगळण्यात येते.

मुंबई,
दिनांक २२ मे, २०२४.

**डॉ. राजेंद्र गं. आंबेकर,**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

## MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

### *NOTIFICATION*

**THE ELECTRICITY ACT, 2003.**

No. MERC/Tech/Regulation/0314.—In exercise of the powers conferred on it by sub-sections (*r*) and (*s*) of Section 181 read with sub-sections (*5*) to (*7*) of Section 42 of the Electricity Act, 2003 (36 of 2003) and all other powers enabling it in this behalf and after previous publication, the Maharashtra Electricity Regulatory Commission hereby makes the following Regulations, to amend Maharashtra Electricity Regulatory Commission (Consumer Grievance Redressal Forum & Electricity Ombudsman) Regulations, 2020 ('**the Principal Regulations**'), namely:

**1. Short title and commencement**

1.1 These Regulations may be called the Maharashtra Electricity Regulatory Commission (Consumer Grievance Redressal Forum & Electricity Ombudsman) (First Amendment) Regulations, 2024.

1.2 These Regulations shall come into force from the date of their publication in the Official Gazette.

**2. Amendment to Regulation 3 of the Principal Regulations: -**

2.1 Regulation 3.3 of the Principal Regulation shall be substituted by the following:

"3.3 A Distribution Licensee shall establish one (1) Forum in each distribution Circle falling within its area of supply:

Provided that where the area of supply is the city of Greater Mumbai and adjoining areas, each Distribution Licensee shall have at least one (1) Forum for such area of supply:

Provided further that the area of jurisdiction of the Forum shall be decided by the Distribution Licensee subject to any guidelines or directions that may be issued by the Commission, from time to time:

Provided also that Forum established under Principal Regulations with jurisdiction of more than one Circle shall henceforth function as Forum for the Circle in which it is located. However, all pending grievances as on date of notification of these Regulations before such Forum shall be decided by such Forum only without transferring it to Forum to be setup for respective Circle.

*Explanation.*—for the purpose of this Regulation 3.3, the term "distribution Circle" shall mean the geographical area falling within the jurisdiction of a Circle office of the successor entities of the Board as may be vested with the functions of distributing electricity pursuant to re-organisation of the Board."

2.2 Regulation 3.4 of the Principal Regulations stands deleted.

**3. Amendment to Regulation 4 of the Principal Regulations:**

3.1 Sub-clause (a) of Regulation 4.1 of the Principal Regulation shall be substituted by the following:

"(a) The Chairperson of the Forum shall be a retired senior judicial officer; or a retired civil servant not below the rank of an Additional Collector or equivalent; or a retired Principal of a reputed Engineering college; or a retired Professor of the Electrical Engineering Department

of a reputed institute; or a retired senior electrical engineer of the Government:

Provided that the Chairperson shall preferably have working knowledge of the vernacular language of the State of Maharashtra:

Provided further that the Chairperson shall be nominated by the Commission after inviting applications from interested persons and selecting from shortlisted candidates:

Provided also that the Commission may specifically direct the Licensee to conduct such selection process under the guidance of the Commission. In such case, the Commission shall nominate the selection committee:

Provided also that the Commission shall verify the integrity and background of such applicants;"

**4. Amendment to Regulation 5 of the Principal Regulations:**

4.1 Proviso to Regulation 5.3 of the Principal Regulations stands deleted.

4.2 Second and Third proviso to Regulation 5.4 of the Principal Regulations stands deleted.

**5. Amendment to Regulation 16 of the Principal Regulations: -**

5.1 Regulation 16.1 of the principal Regulations shall be substituted by the following:

"16.1 The Electricity Ombudsman shall be constituted from amongst a retired judge of a High Court or District Court, a retired Secretary to the Government or equivalent officer."

**6. Amendment to Appendix**

6.1 Appendix 1 of the Principal Regulations stands deleted.

Mumbai
dated 22nd May 2024.

**DR. RAJENDRA G. AMBEKAR,**
Secretary,
Maharashtra Electricity Regulatory Commission.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.